


## प्रस्तावना

'समाजवादी विवेकानंद' हे शीर्षक वाचून तुम्ही आश्चर्यचकित झाला असाल. हिंदुत्ववाद्यांच्या खोट्या प्रचारामुळे विवेकानंदांचे खरे विचार लोकांपर्यंत कधी पोहोचलेच नाहीत. त्यांची प्रतिमा एक हिंदुत्ववादी संन्यासी म्हणून लोकप्रिय केली गेली. स्वामी विवेकानंदांसारख्या महापुरुषांना पळवणे हा आपले कट्टर विचार समाजामध्ये पसरवण्याचा हिंदुत्ववाद्यांचा खूप जुना मार्ग आहे. प्राचीन काळापासून ते हे करत आलेले आहेत.

डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर यांनी सविस्तर संशोधनानंतर *शोध विवेकानंदांचा* हा ग्रंथ लिहून विवेकानंदांचे खरे स्वरूप जनतेसमोर आणले आहे. विवेकानंदांच्या पत्रांचा सखोल अभ्यास करून त्यांची स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था, धर्म, विवेकवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन, समाजवाद याबाबतची मते त्यांनी पुढे आणली आहेत. विवेकानंदांचा समतेकडे आणि समाजवादी समाजरचनेकडे असलेला ओढा दाभोळकरांच्या संशोधनातून स्पष्टपणे पुढे येतो.

केंद्रात भाजपचे सरकार आल्यापासून हिंदुत्ववादाचा आग्रह खूपच वाढला आहे. संविधानातील लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवादाची पायमल्ली करून हिंदुत्ववादी देशात चातुर्वर्णावर आधारित समाजरचना आणण्यासाठी चहू बाजूंनी हल्ला करत आहेत. शिक्षणक्षेत्रातील अनेक क्रमिक पुस्तकांमधील बदल, अनेक पुस्तकांवर बंदी, वैज्ञानिक विचारांपेक्षा पौराणिकतेला महत्त्व देण्याचे प्रयत्न, महत्त्वाच्या संशोधन,



शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थां-समित्यांमध्ये हिंदुत्ववाद्यांची भरती, अशा अनेक प्रकारांनी, प्रसंगी शासकीय यंत्रणेचा वापर करून समाजात सांप्रदायिकता वाढवत आहेत. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दसरा मेळाव्याचे आणि सरसंघचालक मोहन भागवतांचे भाषण दूरदर्शनवर थेट प्रसारित केले गेले. आजपर्यंत असे घडले नव्हते. संकुचित विचार तेही एका धर्मापुरते व पुरुषांपुरत्या मर्यादित असलेल्या संघटनेच्या कार्यक्रमाचे थेट प्रसारण दूरदर्शनने करावे, हे मुळातच धर्मनिरपेक्षतेच्या विचारांच्या विरुद्ध आहे. संघाला सत्तेची मान्यता असण्याचा हा उघडउघड पुरावा आहे.

तर दुसऱ्या बाजूला ह्याच फॅसिस्ट विचारांनी निर्माण केलेल्या द्वेष व असहिष्णूतेच्या परिस्थितीतून जन्माला आलेल्या गुंडांनी देशामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले आहे. ह्याचे उदाहरण म्हणजे विविध धर्मातील अंधश्रद्धांच्या विरुद्ध अहिंसक मार्गाने लढणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोळकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांची खरी ओळख करून देणाऱ्या कॉ. गोविंद पानसरेंची हत्या. सॉक्रेटीस, चार्वाक, तुकाराम ते म. गांधी ही सर्व विवेकवादाच्या लढाईतील बलिदाने आहेत.

स्वामी विवेकानंदांची हिंदुत्ववाद्यांनी केलेली पळवणूक ही भारतीय इतिहासातील एक दुःखद घटना आहे. त्यांनी केव्हाच सांगून टाकले होते की मी पारंपरिक संन्यासी नाही. ते म्हणाले आहेत की "गोशाला वाचवण्याऐवजी माणसे कशी जगतील ते पाहावे." पुढे ते म्हणतातः "आपली मातृभूमी हिंदू आणि इस्लाम या दोन महान परंपरांची मिलाप झालेली भूमी आहे. या मातृभूमीच्या वेदांत मेंदू आणि इस्लाम शरीर बनवा. हे परिपूर्ण भारताचे स्वप्न मी अंतर्मनात पाहत आहे." १८९६ मध्ये ते म्हणाले आहेत की मी समाजवादी आहे. विवेकानंद पळवणाऱ्यांना हा स्वामी झेपलाच नसता आणि म्हणूनच भगवी कफनी घालणाऱ्या या समाजवादी स्वामीला कट्टर हिंदुत्ववादी म्हणून प्रसिद्ध केला.

देशापुढे फॅसिझमचे गंभीर संकट येऊन ठेपले आहे. अशा वेळी विवेकानंदांचे खरे विचार लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. जातीअंत हे आपले ध्येय असले पाहिजे, धर्मग्रंथांपेक्षा बुद्धीप्रामाण्य मान्य केले पाहिजे, व्यक्तिस्वातंत्र्य व स्त्रीमुक्तीशिवाय विकास शक्य नाही, दलितांसाठी आरक्षण असले पाहिजे, धर्मांतरे तलवारीच्या जोरावर नाही तर जातीय अत्याचारांमुळे झाली आहेत अशी प्रखर मते मांडणारे विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी विवेकानंद जनतेसमोर आणणे आवश्यक आहे.

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकरांनी लिहिलेल्या, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रात २०१३ मध्ये प्रकाशित झालेल्या, "अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील अग्रदूत नरेंद्र ... विवेकानंद "या लेखाचे संपादन करून स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे सत्यशोधन जनतेपुढे आणण्याचा एक छोटा प्रयत्न आम्ही करत आहोत.

# विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी विवेकानंद

*डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर*

२० ऑगस्ट हा दिवस नरेंद्रच्या आणि या देशाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा दिवस आहे. नरेंद्र म्हणजे विवेकानंद. विवेकात आनंद घेणारा म्हणून विवेकानंद हे नाव त्यांनी घेतले होते. तो प्रवासही पुढे थोडा समजावून घेऊ. २० ऑगस्ट १८९३ रोजी विवेकानंद अनेक विवंचनेत असणार; ते पण आपण पुढे लक्षात घेऊ. मात्र या अनेक विवंचना बाजूला ठेऊन त्या दिवशी अमेरिकेतून आपल्या शिष्यांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी म्हटलंय, "मी ठामपणे सांगतो, माझ्या देशाला झालेला रोग आणि त्यावरचे औषध मला समजले आहे." विवेकानंद एवढ्या ठामपणे हे विधान करताहेत याचे कारण म्हणजे भटका संन्यासी म्हणून १८९० मध्ये वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी त्यांनी वरहानगर मठ सोडला. ३१ मे १८९३ ला अमेरिकेस जाण्यासाठी ते बोटीवर चढले. त्या तीन वर्षांत त्यांनी भारत उभा आडवा पिंजून काढला. अस्वस्थ होऊन पत्रे लिहिली. त्यात धर्मचर्चा अजिबात नाही. चर्चा आहे ती फक्त हा देश या अवनतीला का पोचलाय याची.

## विवेकवादी विवेकानंद

*कोणत्याही शास्त्रावर विश्वास ठेऊ नको.*

विवेकानंदांनी चमत्कार नाकारलेत. विवेकनंदांनी *दि मेम्फिस कमर्शियल* च्या १५ जानेवारी १८९४ च्या अंकात एका मुलाखतीत सांगितले आहे: "चमत्कारावर आमचा मुळीच विश्वास नाही." पुढे ते म्हणतात:

> विज्ञान कार्यकारणभाव मानते. त्याचप्रमाणे धर्म पण कार्यकारणभाव मानतात. त्यामुळे विज्ञानाप्रमाणे धर्मातही चमत्कारांना स्थान नाही. धर्मग्रंथातील रूपककथांना नंतर बेरकी लोक चमत्कार मानावयास लागले.

मात्र अंधश्रद्धेपासून समाजाला मुक्त करावयाचे असेल तर भविष्य आणि चमत्कार या वेडगळ समजुतींपासून समाजाला मुक्त करणे ही प्राथमिक गरज आहे हे त्यांनी सांगितले.

> जुन्या दंतकथांना रूपकांचा वेश देऊन त्यांना वेडपट महत्त्व दिल्याने अंधविश्वास व खुळचट समजुती बळावतात. हा मानवी समाजाचा दुबळेपणा आहे आणि भोंदू लोक त्याचाच फायदा घेऊन समाजाला नागवतात. कृपया कोणत्याही खुळचट समजुतीचे व अंधविश्वासाचे समर्थन करू नका. त्यांना विरोध करा.
>
> *२६ जुलै १८९५ रोजी बृहदारण्यक उपनिषदावर प्रवचन देताना.*



अमेरिकेत पॅसिडोना येथे भाषण देताना ते म्हणाले:

> आकाशात हिंडणारे वायूचे गोळे पृथ्वीवर हिंडणाऱ्या माणसाच्या कर्तृत्वावर परिणाम करतात असे समजणे हा मानवी मनाला होणारा एक रोग आहे. माणसाचे सामर्थ्य खच्ची करणारी यासारखी दुसरी भयावह गोष्ट नाही.

काही बिलंदर लोकांनी हा आपल्या पोटापाण्याचा व्यवसाय केलाय. त्यांचे पितळ उघडे पाडणे गरजेचे आहे आणि सहज शक्य आहे, हे सांगताना त्यांनी त्याच भाषणात एक गोष्ट सांगितली: "आमच्या भारतात एक फार चांगला राजा होता. पण भविष्याच्या नादी लागल्याने त्याचे व त्यामुळे त्याच्या प्रजेचे फार नुकसान होत होते. राजाच्या दरबारात एक नावाजलेला ज्योतिषी आला. त्याने राजाची पत्रिका बघितली आणि म्हणाला, 'राजा सहा महिन्यांत तू मरणार, अपघाताने वा दगाफटका होऊन.' राजाच्या दरबारात सन्नाटा पसरला. प्रधान शहाणा होता. तो ज्योतिषाला म्हणाला, 'तुम्ही तुमच्या कुंडलीप्रमाणे किती वर्षे जगणार?' ज्योतिषी म्हणाला, 'माझी कुंडली सांगते, मी शंभर वर्षे जगणार.' प्रधानाने आपली तलवार काढली. ज्योतिषाचे मुंडके उडवले व म्हणाला, 'पाहिलंत महाराज, मानवी कर्तृत्व आणि कुंडलीतला योग यातील फरक?'"

अंधश्रद्धा पसरवीत, या देशातील बहुजनसमाजाची पाशवी आणि घृणास्पद पिळवणूक करीत पुरोहितशाही उभी आहे, त्यांचे आर्थिक संबंध त्यात गुंतलेत, हे ते सांगताहेत. भेदक शब्दांत २० ऑगस्ट १८९२ रोजी जुनागडच्या नवाबाला पाठविलेल्या पत्रात त्यांनी म्हटलंय:

> ज्यांच्या पाचशे पिढ्यांनी वेद ही काय चीज आहे हे बघितलेले नाही ते पुरोहित आज या देशाला धर्मग्रंथ सांगून लुबाडताहेत. देवा, ब्राह्मणांच्या रूपाने या देशात वावरणाऱ्या या राक्षसांच्या पासून या देशाचे रक्षण कर.

> कोणत्याही धर्माने अंधविश्वासाची शिकवण दिली नाही. हा अंधविश्वास धर्मग्लानीच्या काळात पुढे येतो. मूर्ख लोक स्वतःमध्ये काहीही सामर्थ्य नसताना, पोपटपंचीच्या जोरावर इतरांना डोळे मिटून विश्वास ठेवावयास सांगतात. पण आंधळेपणाने विश्वास ठेवल्यास अधःपात होतो हेच तर सारे धर्म सांगत असतात, तुम्ही नास्तिक झालात तरी चालेल. पण हे लोक धर्माच्या नावाने सांगतात म्हणून त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेऊन स्वतःला पशूच्या पातळीवर आणू नका.
>
> *५ जानेवारी १८९६ रोजी धर्माचे विज्ञान आणि तत्त्वज्ञान यावर भाषण देताना.*

१८९५ च्या अखेरीस ब्रम्हानंदांना (ब्रम्हानंद म्हणजे वराहनगर मठातील त्यांचा मित्र राखाल) पाठविलेल्या पत्रात ते म्हणतात:

> ढोंगी साधुसंन्यासी व विवक्षित वर्गातील ब्राह्मण यांनी देशाला विपत्तीच्या खाईत लोटले आहे. चोरीमारी आणि दुष्टपणा यातच हे लोक मग्न असतात आणि हेच लोक स्वतःला धर्मोपदेशक म्हणवितात. जर बटाट्याचा वांग्याला स्पर्श झाला तर किती वर्षांनी ब्रम्हांड रसातळास जाईल, हात स्वच्छ करण्यासाठी दहाबारा वेळा जर हातांना माती चोळली नाही तर पूर्वजांच्या चौदा पिढ्या नरकात जातील की चोवीस पिढ्या? गेली दोन हजार वर्षे असल्या गुंतागुंतीच्या प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे शोधून काढण्यात त्यांची मती एकीकडे गुंग होऊन गेली आहे, तर दुसरीकडे देशातील एकचतुर्थांश माणसे भुकेने तडफडून मरत आहेत. अष्टवर्षा कन्येचा तीस वर्षाच्या घोडनवऱ्याशी विवाह होतो आहे, या विवाहाबद्दल आईवडिलांना अत्यानंद होत आहे आणि याला कोणी विरोध करू लागताच, ‘आमचा धर्म तुम्ही बुडवत आहात अशी ओरड केली जाते.’ ज्यांना आपल्या मुली वयात येण्यापूर्वी आई झालेली पाहण्याची घाई झालेली आहे आणि यासाठी जे शास्त्रीय स्पष्टीकरण देतात, त्यांना कसला आला आहे धर्म? अनेक लोक मुसलमानांच्या माथी या दोषाचे खापर फोडून मोकळे होताहेत. आपल्या मूर्खपणाला मुसलमानांना जबाबदार का धरताय? गृह्यसूत्रे बारकाईने वाचून पाहा. त्यात मुलीच्या लग्नाचे वय काय दिले आहे ते पाहा. त्यात अगदी स्पष्टपणे सांगितले आहे, की मुलगी अगदी लहान असताना तिचा विवाह करावा. संपूर्ण गृह्यसूत्रांचा हाच आदेश आहे. आणि वेदप्रणित अश्वमेध यज्ञात याहून वाईट गोष्टी करता येत असत. सर्व ब्राह्मणग्रंथांनी त्याचा निर्देश केलेला आहे आणि त्याच्या खरेपणाबद्दल सगळेच भाष्यकार ग्वाही देतात. अशा स्थितीत या गोष्टी आमच्या धर्मात नव्हत्या असे म्हणून तुम्ही कशा नाकारणार आहात?

*धर्म – त्याच्या पद्धती आणि उद्देश* या निबंधात विवेकानंद आणखी स्पष्टपणे सांगतात:

> जे ग्रंथात सांगितले आहे, त्याच्यावर मी विश्वासही ठेऊ शकत नाही किंवा अविश्वासही करू शकत नाही. जे माझ्या बुद्धीला पटते, जे मी प्रत्यक्ष पाहिले आहे किंवा अनुभवले आहे तेवढेच मी स्वीकारले.
>
> *अमेरिकेत २३ मार्च १९०० रोजी दिलेले व्याख्यान.*



> केवळ धर्मग्रंथांच्यावरच विश्वास ठेवायचा असेल तर आपल्याला तर्कबुद्धी कशासाठी मिळाली आहे? तर्कबुद्धीच्या विरुद्ध एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवणे ही फार मोठी ईश्वरनिंदा नव्हे काय? ईश्वराने दिलेल्या या श्रेष्ठतम देणगीचा उपयोग न करण्याचा आपल्याला काय हक्क आहे? माझी खात्री आहे, जो माणूस ईश्वराने दिलेल्या शक्तींचा उपयोग न करता अंधपणे विश्वास ठेवतो त्याला ईश्वर क्षमा करणार नाही ... काही माणसे जगाला सांगत सुटतात की, ‘आम्ही मोठे धार्मिक लोक आहोत.’ त्यांच्यात काय धार्मिकता आहे कोण जाणे! त्यांनी आजीबाईंच्या काही भाकडकथा ऐकलेल्या असतात आणि मतलबी पुरोहितांनी त्यांना या गोष्टीवर विश्वास ठेवावयास बजावलेले असते. आणि जर त्यांनी विश्वास ठेवला नाही तर त्यांची कंबक्ती, हे त्यांना पटवून देण्यात मतलबी पुरोहित यशस्वी होतात.

१९ नोव्हेंबर १८९३ रोजी न्यूयॉर्क येथून आपल्या मद्रास येथील शिष्यांना उद्देशून त्यांनी जे पत्र पाठवलंय, त्यात ते म्हणतात:

> विकासासाठी पहिली आवश्यक गोष्ट असते स्वातंत्र्य. विचार स्वातंत्र्य आणि उच्चार स्वातंत्र्य, ज्या प्रमाणे माणसाला आवश्यक आहे त्याचप्रमाणे जोवर त्याच्या हातून इतरांचे अनिष्ट होत नाही तोवर त्याला आहार, पेहराव, विवाह आदी सर्वच बाबतीत स्वातंत्र्य असावयास हवे.

अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांच्या पाशामधून या देशाला मुक्त केल्याशिवाय या देशाच्या स्वातंत्र्यालाही काही अर्थ असणार नाही, हे स्वातंत्र्यलढ्याची अभिनव रचना करणाऱ्या विवेकानंदांनी नेमके सांगितलंय. १९ नोव्हेंबर १८९४ रोजी लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपल्या शिष्यांना आठवण करून दिली. "समजा, उद्या इंग्रजांनी आपल्या हातात राज्य दिले आणि ते निघून गेले तर काय होईल? ज्यांच्या हातात हे राज्य येईल ते इतरांना पुन्हा गुलामासारखे वापरतील. या देशात हे जवळ जवळ कायम होत राहिलंय. गुलामांना स्वराज्य

> विवेकानंद ग्रंथावलीच्या तिसऱ्या खंडात पृष्ठ सातवर विवेकानंदांच्या एका शिष्याने आपला अनुभव दिला आहे. तो अनुभव असा: “विवेकानंद मठात बसले होते. त्यांना भेटायला मुंबईचे काही गोरक्षक आले होते. त्यांनी विवेकानंदांना आम्हाला आशीर्वाद द्या असे सांगितले. विवेकानंदांनी, त्या मंडळींना या कामासाठी किती पैसे जमा केले आहेत म्हणून विचारले. त्यांनी रक्कम सांगितल्यावर विवेकानंद त्यांना म्हणाले, ‘आज मध्यप्रदेशात माणसे

भूकेने मरताहेत. हे सर्व पैसे तिकडे पाठवा.' ती माणसे म्हणाली, 'स्वामी तुम्ही सांगताय ते खरे. पण ती माणसे मरताहेत कारण आमचे धर्मग्रंथ सांगतात— त्यांनी गेल्या जन्मात पाप केले होते.' यावर विवेकानंद म्हणाले, 'अरे ही रचना फारच सोपी आहे. मग त्या गायी मरताहेत कारण त्यांनी पण गेल्या जन्मात पाप केले असणार. तुम्ही कशाला उगाच काळजी करताय?' ती माणसे म्हणाली, 'स्वामी तुम्ही सांगताय ते खरे. पण गाय ही आमची आई आहे, असे आमचे धर्मग्रंथ सांगतात आणि आई कशीही असली तरी तिचे रक्षण करावयास हवे.' विवेकानंद शांतपणे म्हणाले, 'आता निघा. आज मला तुमचे आईवडील समजले. याच लोकांच्यात मला या देशात काम करावे लागणार.' नंतर एका पत्रात विवेकानंद म्हणालेत, 'माझ्या देशाचे काही खरे नाही. येथे ढेकणांचा इलाज करण्यासाठीसुद्धा काही श्रीमंत व्यापारी हॉस्पिटल काढणारेत असे ऐकतो?'"

गोहत्येबद्दलचे अधिक नेमके विचार त्यांनी मालमदुरा येथे त्यांना जे सन्मानपत्र दिले त्याला उत्तर देताना सांगितलेत. ती नोंद विवेकानंद ग्रंथावलीच्या पाचव्या खंडात पृष्ठ सत्त्याहत्तरवर येते. विवेकानंद सांगतात, "आज आपण सामान्यतः ज्याला धर्म म्हणतो तो निरनिराळ्या ठिकाणच्या लहान-लहान ग्रामदेवतांमध्ये आणि क्षुद्र खुळचट रूढींमध्ये सामावलेला आहे. स्थानिक रूढी असंख्य आहेत आणि परस्पर विरोधीही आहेत. रूढी म्हणजे खरा धर्म, अशी अज्ञानी लोक जी समजूत करून घेतात, त्यातच त्यांची मोठी चूक आहे. एखादी क्षुद्र सामाजिक रूढी बदलली म्हणजे काही तुमचा धर्म बुडत नाही, मुळीच बुडत नाही. लक्षात ठेवा, की रूढी या नेहमीच बदलत आल्यात. भारतात असा एक काळ होता, की गोमांस खाण्यावाचून ब्राह्मण हा ब्राह्मण राहू शकत नसे; वेदात तुम्हाला आढळेल, की जेव्हा एखादा संन्यासी, राजा किंवा थोर पाहुणा घरी येई तेव्हा उत्तम बैल मारण्यात येत असे. नंतर पुढे लोकांच्या लक्षात आले, की आपला देश कृषीप्रधान आहे. म्हणून उत्तम बैलांची हत्या केल्याने, शेतीचे नुकसान होईल, म्हणून ही रूढी बंद पडली व गोहत्त्या निषिद्ध मानली गेली. काळाच्या ओघात दुसरे काही नियम केले तर तेही निरुपयोगी ठरून कालौघात विलीन होतील व दुसऱ्या स्मृती तयार होतील. अधिक सोप्या शब्दात सांगावयाचे तर जो सारभूत महत्त्वाचा भाग असतो तो नित्य असतो आणि गौण गोष्टी या तात्कालिक महत्त्वाच्या असतात आणि जर विशिष्ट काळानंतर या गौण गोष्टींच्या जागी जर दुसऱ्या अधिक उपयुक्त गोष्टी आणल्या नाहीत, तर त्यांच्यापासून खरा धोका असतो."



हवे असते इतरांना गुलाम बनवण्यासाठी. आणि त्या प्रक्रियेत स्वतः पुन्हा गुलाम होण्यासाठी." आणि हे सारे टाळावयाचे असेल तर काय करावयास हवे हे त्यांनी आपला मित्र शशी, जो रामकृष्णांचा सर्वांत आवडता म्हणून ज्याला रामकृष्णानंद म्हणत, त्याला १९ मार्च १८९४ रोजी लिहिलेल्या पत्रातून कळवलंय. त्यांनी लिहिलंय:

> प्रत्येक खेड्यात एक संन्याशी म्हणजे कार्यकर्ता ठेवावा लागेल. त्याच्या बरोबर वेद, कुराण, बायबल असतील. या संन्याशाला 'सर्व धर्मांचा सन्मान करणे' हा धर्माचा खरा अर्थ लोकांना शिकवावा लागेल. इतकेच नव्हे तर, या संन्याशांच्या बरोबर पृथ्वीचा गोल असेल. ते भूगोलाच्या मदतीने इतिहास शिकवतील. त्यांच्याबरोबर लोहचुंबक असेल, रसायनातील प्रयोग असतील. आधुनिक विज्ञान समजावून देऊन आपणाला आपल्या लोकांना तमोयुगातून बाहेर काढून, त्यांची आज जी पाशवी पिळवणूक होते आहे त्यातून मुक्त करावे लागेल.

## जातीव्यवस्थेबाबत विवेकानंद

*आपण जातीअंताची लढाई लढतोय. आपणाला ब्राह्मणांना दलित आणि दलितांना ब्राह्मण बनवायचे नाही!*

पाशवी वागणूक आणि घृणास्पद पिळवणूक यावर उभ्या असलेल्या जातीव्यवस्थेच्या विरोधात कठोर भूमिका घेत विवेकानंदांनी त्यावर कोरडे ओढले होते.

जातीव्यवस्था संपवायची असेल तर ती का व कशी सुरू झाली, हे समजावून घ्यावयास हवे, याची जाण विवेकानंदांना आहे. अभ्यासातून जे समजले ते इतरांना काय वाटेल याचा विचार न करता १७ ऑगस्ट १८९९ रोजी वराहनगर मठातून पूज्यपादांना पत्र पाठवून ते सांगतात:

> आपल्या देशातील प्राचीन मतानुसार जाती विभाग हा वंशगत मानलेला आहे, याबद्दल मला शंका नाही. स्पार्टा देशातील लोकांनी तेथील गुलामांवर वा अमेरिकेतील लोकांनी तेथील निग्रोंवर जेवढे अत्याचार केले, त्यापेक्षा जास्त अत्याचार कधी कधी आपल्या देशातील शूद्रांवर केले आहेत, याबाबतही संदेह नाही.

भारतातील थोर विचारवंतांमध्ये बुद्धदेव हेच असे एकमेव आहेत की ज्यांना जातीभेद मान्य नव्हता. इतर सर्वच दार्शनिकांनी सामाजिक अंधविश्वासांना कुरवाळले आहे.

*९ जुलै १८९५ रोजी दिलेल्या प्रवचनातून.*

यापूर्वी २० ऑगस्ट १८९२ रोजी लिहिलेल्या आपल्या ऐतिहासिक पत्रात विवेकानंद म्हणालेत:

> ब्राह्मणांच्या रूपाने या देशात वावरणाऱ्या राक्षसांच्यापासून देवा या देशाचे रक्षण कर.

अमेरिकेत विलक्षण यश मिळवल्यानंतर विवेकानंद १५ जानेवारी १८९७ ला कोलंबोला आले. तिथून नंतर त्यांनी आपली 'कोलंबो ते अल्मोरा' ही यात्रा सुरू केली. या यात्रेत फेब्रुवारीमध्ये ते कुंभकोणमला पोचले. कुंभकोणम हे मद्रासपासून १६० मैलांवर असलेले गाव. मद्रासमधील सनातनी ब्राह्मणांचा हा बालेकिल्ला आणि तेथील ब्रह्मवृंदांसमोर भाषण देताना हा संन्यासी सांगतो:

> ब्रह्मवृंदहो, मी तुमच्या आणि माझ्या जातींची मृत्युघंटा वाजवायला येथे उभा आहे. आपल्या जाती जर सुखाने मेल्या नाहीत तर त्या कुजतील. त्यामुळे आपल्याला व समाजाला पण त्रास होईल. आपल्याला सुखाने मरण यावे म्हणून आपण फक्त एक गोष्ट करूया. आपण सांगूया, 'आम्ही उच्चवर्णीय आहोत. आम्ही अर्थार्जनासाठी नोकरी करणार नाही. त्या सर्व नोकऱ्या दलितांच्यासाठी मोकळ्या ठेवणार आहोत.'

म्हणजे विवेकानंद शंभर टक्के आरक्षण मागतात!

विवेकानंद आरक्षणाच्या व्यावहारिक बाजूंचा पण विचार करतात. ते सांगतात, "दलित आपल्याएवढे हुशार नाहीत. कारण आपण त्यांना शेकडो वर्षे ज्ञानापासून वंचित ठेवलंय. त्यामुळे आपल्याला जर एक शिक्षक लागत असेल तर दलित मुलांना सात शिक्षक लागतील. आपल्यापेक्षा सातपट अधिक चांगल्या शिक्षणाची आपण त्यांच्यासाठी सोय केली पाहिजे." विवेकानंद केवळ येथेच थांबत नाहीत. १८९६ मध्ये आपला मित्र राखाल याला पत्र पाठवून ते सांगतात, "काही लोक म्हणतात, निसर्गातच समता नाही त्याला आम्ही काय करणार? त्यांना आपण सांगितले पाहिजे, निसर्गात समता नसेल तर ती निर्माण करण्यासाठी आमचा जन्म आहे. म्हणजे दलितांच्या साठी सातपट नव्हे तर दहापट अधिक चांगल्या शिक्षणाची सोय आपणाला करावी लागेल."

मात्र हे सारे सांगणारे विवेकानंद 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर' वाद खेळत नाहीत. आपले 'महाप्रतापी पूर्वज तामिळ' या लेखात ते म्हणतात:

> आपण जातीअंताची लढाई लढतोय. आपणाला ब्राह्मणांना दलित आणि दलितांना ब्राह्मण बनवायचे नाही!

ज्या कालखंडात राजर्षी शाहू महाराजांसारख्या लोकोत्तर पुरुषालाही, आपल्या



राजधानीत वेगवेगळ्या जातींसाठी वेगवेगळी वसतिगृहे ठेवावी लागत होती, त्या कालखंडाच्या दहा वर्षे आधी विवेकानंद सांगताहेत:

> माझ्या मठात ब्राह्मण मुलांबरोबर, चांभार, महार, भंगी यांचीच मुले नव्हे तर मुसलमान आणि ख्रिश्चन यांचीही मुले एकत्रित राहतील. त्यांना एकत्र जेवावे लागेल. मात्र तेथे त्यांच्या सवयीप्रमाणे गोड, तिखट, शाकाहारी, मांसाहारी असे जेवण दिले पाहिजे.

## धर्माबद्दल विवेकानंद

*आपणाला नवा धर्म, नवा देव आणि नवा वेद हवा आहे. कारण आपल्याला नवा भारत घडवायचा आहे.*

विवेकानंदांची धर्माबद्दलची मांडणी अतिशय सुंदर आहे:

> माणसाला माणूस बनवतो तो खरा धर्म.

प्रतिगामी धर्मांध शक्ती हिंदू-मुसलमान यांच्यात खुन्नस निर्माण करून देशाचे अपरिमित नुकसान करताहेत, हे विवेकानंद सांगतात. संघपरिवाराकडून आपल्याला जे सांगितले जाते, त्याच्या उलट विचार विवेकानंद धर्मावर भाष्य करताना सांगतात. त्यांनी कायम अशा पद्धतीच्या मूलतत्त्ववादाच्या विरोधात भूमिका घेतली आहे. ते म्हणतात:

> सर्व धर्मांचे मूलतत्त्व हे आहे की, आपण एक धर्म स्वीकारला तर आपणाला सारे धर्म स्वीकारावे लागतील आणि एक धर्म नाकारला तर सारे धर्म नाकारावे लागतील आणि हे करत असताना कोणताही धर्म न मानणारी, पण खऱ्या अर्थाने धार्मिक असलेली माणसे आपल्या समोर आहेत हे ओळखून त्यांचा आदर केला पाहिजे.

धार्मिक विद्वेषावर आधारित प्रचारासाठी संघपरिवार विवेकानंदांच्या प्रतिमेचा वापर करतो. कारण लोकांना विवेकानंदांचे खरे विचार माहित नाहीत. संघपरिवाराकडून उभी केलेली विवेकानंदांची खोटी प्रतिमाच लोकांना माहित आहे. मात्र, संघपरिवार विचारही करू शकणार नाही, अशी एक गोष्ट विवेकानंद सांगतात:

> इस्लाम हा एक श्रेष्ठ धर्म आहे हे समजावून घ्या. समतेचा संदेश इस्लामने सर्वप्रथम व्यवहारात आणला.

विवेकानंद सर्वधर्मसमभाव मानतात. विवेकानंदांनी आग्रहाने सांगितले आहे की, या देशाचा अभ्युदय करायचा असेल तर हिंदू-मुसलमान सहकार्यच नव्हे तर समन्वय हवा. आणखी एका पत्रात ते इस्लाममधील समतेच्या तत्त्वाचा आवर्जून उल्लेख करतात. १० जून १८९८ रोजी अल्मोरा येथून मोहम्मद सर्फराज हुसेन यांना पत्र पाठवून त्यांनी

कळविले:

माझी अगदी पूर्णपणे खात्री पटली आहे, की वेदान्त मताचे सिद्धान्त कितीही सूक्ष्म व सुंदर असले तरी जोपर्यंत इस्लाम धर्मातील प्रत्यक्षात आणलेल्या समतेची जोड त्यांना दिली जात नाही तोपर्यंत ते समाजाच्या दृष्टीने पूर्णपणे निरुपयोगी आहेत.

१८९० ते १८९३ या कालावधीत परिव्राजक म्हणजे भटका संन्यासी म्हणून हिंडत असताना विवेकानंदांनी देशातील गरिबी व तिचे धार्मिक मागासलेपणाशी आणि ब्राह्मणी साधूंकडून होणाऱ्या शोषणाशी असलेले नाते अत्यंत जवळून पाहिले. अस्वस्थ होऊन या देशाच्या भयावह परिस्थितीचा आलेख आपल्या पत्रांमधून आपल्या मित्रांसमोर मांडला. ती पत्रे म्हणजे अग्निफुले आहेत किंवा निद्रिस्त ज्वालामुखीचे पहिले हुंकार. एका पत्रात त्यांनी लिहिले:

ज्या देशातील कोटी कोटी लोक फक्त मोहाची फुले खाऊन जगतात आणि ज्या देशातील दहा-वीस लाख साधू आणि लाखो-करोडो ब्राह्मण गरिबांचे रक्त शोषतात, पण त्यांच्या उन्नतीसाठी काहीही करत नाहीत, त्याला देश म्हणावे की नरक? हा काय धर्म आहे की सैतानाचे तांडव?

विवेकानंदांनी हे अधिक भेदकपणे २७ ऑक्टोबर १८९४ रोजी वॉशिंग्टनहून अळसिंगा पेरूमल याला पाठविलेल्या पत्रात सांगितलंय. ते लिहितात:

जो धर्म वा जो ईश्वर विधवांचे अश्रू पुसत नाही किंवा पोरक्या अनाथ बालकांच्या मुखात अन्नाचा घास घालत नाही त्या धर्मावर वा त्या ईश्वरावर माझा विश्वास नाही.

आपण बुद्धदेव काय म्हणाले ते म्हणूनच समजावून घेण्याची गरज आहे. ते म्हणालेत, 'ईश्वरकल्पना नुसती तर्कविसंगतच नाही तर ती अनीतीला कारणीभूत होणारी आहे. कारण माणसाला ती दुर्बल बनविते व बाहेरून मदतीची याचना करण्यास त्याला शिकविते. ज्याला कोणी कधी पाहिले नाही, ज्याला कोणी कधी अनुभवले नाही व ज्याच्याकडून कोणालाही कधी सहाय्य लाभले नाही त्याच्यावर विसंबून का राहता? तुम्ही असे भित्रे का बनता?'

*१२ नोव्हेंबर १८९७, लाहोर येथे दिलेले भाषण.*



मात्र हा धर्म काही लोकांना आपल्या मतलबासाठी हवा आहे. हे लोक धर्माधर्मात भांडणे लावतात. विवेकानंदांना मात्र या देशात सर्वधर्म समभाव हवाय. हिंदू-मुसलमान यांच्यामध्ये स्वतःच्या स्वार्थासाठी पसरवला जाणारा द्वेष समजावून देताना विवेकानंदांनी किमान दोन पत्रांमधून स्पष्टपणे सांगितलंय:

*या देशातील धर्मांतरे ख्रिश्चन आणि मुसलमान यांनी केलेल्या अत्याचारांमुळे नव्हे तर उच्चवर्णीयांनी केलेल्या अत्याचारांमुळे झाली आहेत.*

या देशातील धर्मांतरे ख्रिश्चन आणि मुसलमान यांनी केलेल्या अत्याचारांमुळे नव्हे तर उच्चवर्णीयांनी केलेल्या अत्याचारांमुळे झाली आहेत. ते आपले अभागी भाऊ आहेत. दलितांच्याबद्दल जी कणव आपल्या मनात आहे तीच त्यांच्याबद्दलही आपल्या मनात हवी. कारण धर्मांतरामुळेही त्यांची जात बदललेली नाही. त्यांनी आपापल्या जातीत धर्मांतर केलंय!

परिव्राजक म्हणजे भटका संन्यासी म्हणून भारतभर हिंडत असताना २० सप्टेंबर १८९२ रोजी मुंबईहून खेतरीनिवासी पंडित शंकरलाल शर्मा यांना पाठविलेल्या पत्रात ते सांगतात:

ज्या ठिकाणी ब्राह्मणच संपूर्ण जमिनीचे मालक असून जेथील साऱ्या स्त्रिया एवढेच नव्हे तर राजवंशातील स्त्रियादेखील ब्राह्मणांची उपपत्नी होऊन राहण्यात मोठा सन्मान मानतात, जिथे पुरोहितांचा अत्याचार भारतात सर्वांपेक्षा जास्त आढळतो, त्या त्रावणकोर प्रांतात जवळजवळ एकचतुर्थांश लोक ख्रिस्ती बनले आहेत, मग मी त्यांना का दोष देऊ?

आज ब्राह्मण आणि पुरोहित सत्वगुणाच्या बहाण्यावरून देश तमोगुणात बुडवीत आहेत. मठ्ठ लोक ब्रह्मविद्येवरील प्रेमाच्या नावाखाली स्वतःचा अजागळपणा झाकून ठेवत आहेत. हे आळशी लोक स्वतःच्या सामाजिक निष्क्रियतेवर वैराग्याचे पांघरूण घालत आहेत. अतिशय क्रूर असे हे लोक तपश्चर्येचे आणि यज्ञांचे ढोंग रचून आपली वागणूक म्हणजे धर्म असे आम्हाला सांगत आहेत. पुस्तके पोपटासारखी पाठ करणे आणि बापजाद्यांची खोटी बढाई मारणे एवढेच यांचे कर्तृत्व आहे. देश यांच्यामुळे रसातळाला जातोय.

*श्रीमती मृणालिनी बोस यांना लिहिलेल्या पत्रामधून.*

त्यानंतर दोन वर्षांनी परिव्राजक विवेकानंद स्वामी म्हणून जगभर मान्यताप्राप्त आहेत. मात्र त्यांच्या मनात अजून हेच वादळ आहे. शिकागोहून नोव्हेंबर १८९४ मध्ये श्री हरिदास बिहारीलाल देसाई यांना पत्र पाठवून ते सांगतात:

> भारतात गरिबांमधूनच इतक्या मोठ्या प्रमाणावर लोक मुसलमान झालेले का आढळतात? केवळ तलवारीच्या जोरावर त्यांच्यात असे धर्मांतर घडवून आणले गेले असे म्हणणे महामूर्खपणाचे होय. त्यांनी धर्मांतर केले... जमीनदारांच्या कचाट्यातून सुटण्यासाठी... पुरोहितांच्या हातून मुक्त होण्यासाठी... स्वाधिनतेसाठी... म्हणून बहुसंख्य जमीनदार हिंदू असलेल्या बंगालमध्ये मुसलमान किसानांची संख्या हिंदू किसानांपेक्षा अधिक आढळून येते. या लाखो अवनत व दलित माणसांच्या उद्धाराची चिंता कुणाला आहे? इतिहासाच्या कुठल्यातरी कालखंडात आपल्या श्रीमंत व उच्चभ्रू लोकांनी, पुरोहितांनी आणि सत्ताधीशांनी या गरीबांबद्दल सहानुभूती तरी दाखविल्याची नोंद आढळते काय? या गरीबांच्या पिळवणुकीमुळेच या साऱ्यांची चैन चालली आहे.

विवेकानंद सांगतात: माणसाचे भले करण्यासाठी जन्माला आलेल्या या धर्मांनीच आपापसात भांडून जगात महाभयंकर रक्तपात घडविला आहे. मानवी समाजाला आणि संस्कृतीला प्रचंड यातना दिल्या आहेत. मात्र माणसाच्या अशाश्वत जीवनातील त्याच्या शाश्वत अस्तित्वाचा आधार असल्यामुळे, कुठलातरी धर्म प्रत्येक माणसाला हवा असतो. *त्यामुळे या धर्माचा आधार घेऊनच आपणाला धर्मावर आघात करावयाचा आहे.* सर्फराज मोहम्मद यांना १० जून १८९८ रोजी पाठविलेल्या पत्रातील एक भाग:

> ज्या ठिकाणी वेद नाही, कुराण नाही आणि बायबलही नाही अशा ठिकाणी आपणाला मानव जातीला घेऊन जावयाचे आहे. मात्र हे काम आपणाला वेद, कुराण आणि बायबल यांचा आधार घेऊनच करावे लागेल.

खरंतर धार्मिक माणसे किंवा संघपरिवारातील माणसे ज्यांचा विचारही करू शकणार नाहीत, अशी पत्रे विवेकानंदांनी लिहिलीत. डॉ. श्रीराम लागू ज्यावेळी म्हणाले, 'देवाला रिटायर करा' त्यावेळी काय महाभारत झाले, कोणी घडवले, हे आपणाला माहीत आहे. मात्र विवेकानंदांनी, लागूंच्या शंभर वर्षांआधी, २७ एप्रिल १८९६ रोजी आलमबाजार मठातील आपल्या गुरूबंधूंना पत्र पाठवून कळवले:

> **आपले देव आता जुने झालेत. आपल्याला आता नवे देव, नवा वेद आणि नवा धर्म हवा आहे.**



त्यामागची कारणे विशद करताना ते म्हणतात:

> **कारण आपल्याला नवा भारत घडवायचा आहे.** एखाद्या भुकेलेल्या माणसाला भाकरीचा तुकडा देऊन त्याची भूक ज्यांना शमवता येत नाही, अनाथ मुलांच्या आणि विधवांच्या डोळ्यातील अश्रू ज्यांना पुसता येत नाहीत ते इतरांना मुक्ती काय देणार? 'शिवू नका' हा मानसिक रोग झालेला आणि 'गंध उभे लावावे की आडवे' या गहन तात्विक चर्चेत रमलेला हा आजचा धर्म आहे. आपणाला नवा धर्म हवा आहे.

हे सारेच तत्त्वज्ञान विलक्षण आहे.

## परिवर्तनाच्या चळवळीचे अग्रदूत विवेकानंद

आपल्या अनेक पुस्तकांतून आणि भाषणांमधून विवेकानंद लोकांना मानसिक गुलामीत ठेवण्यासाठी धर्माचा वापर करण्यावर, अंधश्रद्धेवर, जातीव्यवस्था व धर्माधारित भेदभावावर जोरदार टीका करतात. आणि देशातील गरिबीबद्दल गंभीर चिंता व्यक्त करतात. विवेकानंदांची ही अग्निफुले 'सर्वांनीच' नीटपणे समजावून घेतली पाहिजेत. त्यातील काही ज्वालाग्राही विचार असे आहेत.

- "कोणत्याही शास्त्रावर विश्वास ठेऊ नको. वेद थापाडे आहेत. शास्त्रे जर माझ्या अनुभूतींशी वा उपलब्धींशी जुळतील तर ते त्या शास्त्रांचेच भाग्य! सर्वांत श्रेष्ठ शास्त्र स्वतः मीच आहे. यागयज्ञ आणि देवदेवार्चन निष्फळ होत." (*दैवीवणी, कु. वाल्डो यांनी संकलित केलेल्या विचारांमधून.*)
- "समाजाचे भले करू पाहणाऱ्यांचे काम आज अधिकाधिक कठीण होत जाणार आहे. कारण विज्ञानाच्या झंझावातापुढे सर्व स्वमतान्ध धर्मांचे बुरूज धडाधड कोसळत आहेत. मात्र धर्म हे ज्यांच्या उपजीविकेचे साधन बनलंय ते लोक त्यामुळे वेगळी खेळी खेळताहेत. ते धर्माला व्यक्तिगत बाब न ठेवता त्याला सांघिक कवायतीचे स्वरूप देताहेत! धर्म त्यांनी दिवाणखान्यात आणि रस्त्यावर आणायला सुरुवात केली आहे. आणि गोंधळलेली मानवजात धर्माच्या सांगाड्यालाच धर्म समजून त्याला कवटाळून बसायला लागली आहे ..." (*विज्ञान व धर्म यावरचे चिंतन, प्रवचन व पत्रे यामधून.*)
- "जे धर्मगुरू आज सत्वगुणी म्हणून मिरवताहेत त्यातील ९० टक्के खरेतर तमोगुणी आहेत. आता आपण या देशातील लोकांना मांस, मासे खाऊन कार्यप्रवण करण्याची गरज आहे." (*बेलूर मठात १८९८ मध्ये शिष्यांचे प्रबोधन.*)

- “शंकराचार्यांची बुद्धी वस्तऱ्याच्या धारेप्रमाणे तीक्ष्ण आहे. दक्षिणी भटजींप्रमाणे ब्राह्मणांचा त्यांना भलताच गर्व आहे. ब्राह्मणेतर जातींना ब्रह्मज्ञान होणार नाही हे वेदान्तसूत्र-भाष्यात काय ठामपणे मांडले आहे त्यांनी. केवढा हा भयंकर माणूस. वादात हरवून त्यांनी कितीतरी बौद्ध श्रमणांना जाळून मारले.” *(बेलूर मठात शिष्यांचे प्रबोधन.)*

- “या देशात युधिष्ठिर, अशोक, अकबर यांच्यासारखे कार्यक्षम व दयाळू राजे झाले हे खरे. पण हे अपवाद आहेत. बहुसंख्य राजे प्रजेला पिळणारे होते. प्रत्येक देशाचा राज्यकारभार हा त्या देशातील लोकांच्या मताप्रमाणे चालला पाहिजे हे आधुनिक पाश्चात्य देशांचे ब्रीदवाक्य आपण स्वीकारले पाहिजे.” *(‘उद्बोधन’ मासिकात १८९९ च्या मार्चमध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखांमधून.)*

- “जगाचे, मानवाचे मंगल करण्यासाठी जन्म घेतलेल्या सर्व धर्मांनीच सर्वाधिक रक्तपात करून मानवाला सर्वाधिक दुःख दिले आहे. भविष्यकाळात जग जिंकण्यासाठी बौद्ध, ख्रिस्त व इस्लाम यांच्यात झगडा होईल. इतर धर्मांना अनिवार्यपणे या झगड्यात वापरले जाईल. आणखी एक गुंता आपणासमोर आहे. विज्ञान वस्तूंची विपुलता आपणासमोर आणेल. अनावश्यक वस्तूत मानवजात गुंतून पडेल. त्यातून चंगळवाद येईल. वस्तूंच्या विपुलतेमुळे माणसे आत्मकेंद्री बनतील. माणसांचे एकमेकात गुंतणे संपेल. आपणाला कदाचित नवी समाजरचना शोधावी लागेल. प्रत्येक चळवळीला या सर्वाचे भान हवे.” *(बाल्डो यांच्या कागदपत्रातील अपूर्ण लेखावरून.)*

- “ज्याप्रमाणे काही धार्मिक लोकभ्रम असू शकतात, त्याचप्रमाणे विज्ञानाच्या क्षेत्रातही काही लोकभ्रम आढळून येतात. खरे विज्ञान आपणाला सांगते की, आपण याबाबत सावधपणा दाखविला पाहिजे. आधुनिक विज्ञानातील बऱ्याचशा प्रचलित समजुती व कल्पना सिद्ध झालेल्या नाहीत. आपली प्रगती थांबवण्यासाठी पसरविलेल्या त्या वैज्ञानिक अंधश्रद्धा आहेत का, हे तपासून बघायला शिका.” *(कॅलिफोर्नियात ‘होम ऑफ ट्रुथ’ या ठिकाणी दिलेल्या व्याख्यानामधून.)*

- “कार्यकर्त्यांचे प्रेम मृत्यूवर असले पाहिजे, याचा अर्थ आपण आत्महत्या करावी असा मुळीच नाही. आत्महत्या करणारे लोक भ्याड असतात. आत्महत्या करताना एखादा अयशस्वी झालेला माणूस तो प्रयत्न दुसऱ्यांदा करताना फारसे आढळत नाही. मग मृत्यूवर प्रेम करणे म्हणजे काय? आपण मरणार हे जन्म घेतल्यावर निश्चितच आहे. मग आपण चांगल्या उद्दिष्टासाठी मरूया. आपली सर्व कामे आपण आत्मसमर्पणाच्या भावनेने करूया.... आणखी एक गोष्ट लक्षात ठेवावयास हवी. माणसे तयार करणे हे कोणत्याही कार्याचे उद्दिष्ट हवे.” *(मठातील नोंदवहीत १९ जून १८९९ रोजी काढलेल्या टिपणांचा सारांश.)*



- “तुमचे आयुष्य तुमच्या कार्यासाठीच आहे. पण तरीही सर्वप्रथम स्वतःच्या प्रकृतीची काळजी घ्या. कारण तुमचे अस्तित्व तुमच्या कार्यासाठी सर्वांत महत्त्वाचे आहे. आणखी एक गोष्ट लक्षात ठेवा. व्यावहारिक बाबतीत अजिबात अजागळपणा नको—पैशाच्या व्यवहारात प्रत्यक्ष बापावरही विश्वास ठेऊ नका. व्यवहार हा व्यवहार असतो. व्यवहार न समजल्याने अनेक चांगले उपक्रम नाहीसे होतात.” *(शिष्यांना पाठविलेल्या पत्रातून.)*

- “जो धर्म, जो समाज स्त्रियांना समानतेचा हक्क देत नाही, तो धर्म, तो समाज हा सैतानाचा बाजार आहे. पक्षी कधी एका पंखाने उडू शकत नाही. अमेरिका संपन्न आहे, सुसंस्कृत आहे, श्रीमंत आहे कारण येथील स्त्रिया मुक्त आहेत. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या आहेत. त्या साक्षात जगदंबा आहेत. मृत्युपूर्वी अशा शंभर स्त्रिया जरी मी भारतात निर्माण करू शकलो तर मी सुखाने मरेन. पण हे फार कठीण काम आहे. कारण रजस्वलेने मंदिरात जाऊ नये असा भंपक उपदेश करीत येथील धर्म उभे आहेत. आणि मी तर तुम्हाला सांगतोय दक्षिणेश्वरचे मंदिर वेश्यांसाठीही खुले असले पाहिजे.” *(शिष्यांना पाठविलेल्या पत्रामधून.)*

- “आजचा अटळ संघर्ष, उपभोग्य वस्तूंचा माणसाने जास्तीतजास्त उपयोग करावा या रचेनेतून निर्माण झाला आहे. खरी गरज किमान आजतरी, माणूस किमान किती गोष्टींत सुखी, समाधानी, आनंदी राहू शकतो हे ठरविण्याची आहे.” *(कुंभकोणमला ‘वेदांताचे कार्य’ या विषयावर बोलताना. )*

जर दक्षिणेश्वरासारख्या मोठ्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी वेश्यांना जाऊ दिले नाही तर मग त्यांनी कोठे जावे? ईश्वर अवतार घेतो तो विशेष करून पाप्यांसाठी, पुण्यवंतांसाठी नव्हे! मंदिरात उभे राहूनही ज्यांच्या मनात, अमूक एक स्त्री वेश्या आहे, अमका मनुष्य खालच्या जातीचा आहे, अमका दरिद्री आहे अशा गोष्टी येतात, अशा लोकांची (म्हणजेच ज्यांना तुम्ही ‘सभ्यगृहस्थ’ म्हणता त्यांची!) संख्या जितकी घटेल तितकी चांगली.

*२३ ऑगस्ट १८९६, स्वित्झर्लंडमधून शशी (रामकृष्णानंद) यांना पाठविलेल्या पत्रामधून.*

## समाजवादी विवेकानंद

१८९० ते ९३ या तीन वर्षात या भटक्या संन्याशाने भारत उभा आडवा पिंजून काढला. या खंडप्राय देशातील लोकांचे नेमके प्रश्न समजावून घेतले. त्यासाठी ते पायी हिंडले, घोड्यावरून हिंडले, रेल्वेतून हिंडले, भंग्याबरोबर बसून चिलीम ओढली, झोपडपट्टीत राहिले, अबूच्या पहाडात चंपा नावाच्या गुहेत एका मुसलमानाच्या घरी राहिले, टिळकांच्याबरोबर गायकवाड वाड्यात आणि खेतरी नरेशांच्या राजवाड्यात असा सर्वत्र मुक्काम केला. या तीन वर्षांच्या अथक भटकंतीत त्यांनी धर्मचिंतन वगैरे केले नाही. अस्वस्थ होऊन या देशाच्या भयावह परिस्थितीचा आलेख आपल्या पत्रांमधून आपल्या मित्रांसमोर मांडला आहे.

१९ नोव्हेंबर १८९३ रोजी न्यूयॉर्क येथून आपल्या मद्रास येथील शिष्यांना उद्देशून त्यांनी जे पत्र पाठवलंय, त्यात ते लिहितात:

> जो भगवान मला इथे अन्न देऊ शकत नाही तो स्वर्गात मला अनंत सुखात ठेऊ शकेल, यावर माझा विश्वास नाही. भारताचा उद्धार करावयास हवा, गरिबांना पोटभर अन्न द्यावयास हवे. शिक्षणाचा प्रसार करावयास हवा आणि पुरोहितगिरी नष्ट करावयास हवी. पुरोहितांचा जुलूम नको, सामाजिक अत्याचार नको, प्रत्येकाला पोटभर अन्न आणि जीवनात पुढे येण्याची अधिकाधिक संधी मिळावयास हवी.

१८९४ मध्ये शिकागोहून आपला शिष्य अळसिंगा पेरूमल यांना पाठविलेल्या पत्रात विवेकानंदांनी स्पष्टपणे म्हटले:

> मी दार्शनिक नाही, तत्त्वज्ञ नाही व संतही नाही. मी गरीब आहे आणि गरीबांबद्दल मला प्रेम वाटते. दारिद्र्य, अंधश्रद्धा, अज्ञान आणि रूढी, यांत रुतून बसलेल्या भारतातील वीस कोटी स्त्री-पुरुषांबद्दल कुणाचे मन कळवळले का? या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता?

विवेकानंदांनी २३ जून १८९४ रोजी शिकागो येथून म्हैसूरच्या राजेसाहेबांना पाठवलेल्या पत्रात आर्थिक शोषणावरही भाष्य केले आहे:

> पाश्चात्य लोक आमच्या जातीभेदावर कितीही टीका करोत, पण त्यांच्यात आमच्यापेक्षाही अधिक वाईट असा जातीभेद आहे—आणि तो म्हणजे पैशावर उभारलेला जातिभेद, अर्थगत जातीभेद.

अखेर, दोन वर्षानंतर, १ नोव्हेंबर १८९६ या दिवशी, लंडनहून अमेरिकेतील आपली शिष्या कुमारी मेरी हेल यांना पाठविलेल्या पत्रात ते सांगतात 'मी समाजवादी आहे.'



अचानक लहर आली म्हणून विवेकानंदांनी हे विधान केलेले नाही. सखोल विचारांती ते आपल्याला समाजवादी म्हणवून घेतात. त्यासाठी १८९६ या वर्षाचे महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. हे वर्ष अनेक दृष्टीने महत्त्वाचे आहे. विवेकानंदांचे वय त्यावेळी ३३ वर्षांचे आहे. ३९ वर्षांच्या आयुष्यातील हा महत्त्वाचा टप्पा आहे. आणखी एक म्हणजे त्यापूर्वी १८९० ते ९३ अशी तीन वर्षे परिव्राजक म्हणजे भटका संन्यासी, विविदिशानंद, सच्चिदानंद अशी नावे बदलून शेवटी विवेकानंद हे नाव त्यांनी स्वतःसाठी नक्की केलंय. या तीन वर्षांत त्यांनी अस्वस्थ होऊन, या देशातील प्रश्न आणि त्यावरची उत्तरे शोधलीत. १८९३ साली हा अनाम संन्यासी अचानक एके दिवशी जगाच्या व्यासपीठावर विराजमान झाला. प्रगत देश पाहताना मानवी समस्यांची मांडणी त्यांनी मनात नक्की केली आणि त्यापुढील तीन वर्षांच्या चिंतनाचे फलित म्हणून त्यांनी पत्रात 'मी समाजवादी आहे' म्हणून सांगितले.

विवेकानंद समाजवादी आहेत पण हा दार्शनिक हे अंतिम सत्य म्हणून स्वीकारत नाही. त्याच पत्रात ते पुढे म्हणतात:

> समाजवाद ही परिपूर्ण रचना आहे असे मी मानत नाही. पण आजवर मानवजातीने ज्या वेगवेगळ्या रचना शोधल्या आणि वापरल्या, त्यात ती अधिक चांगली रचना आहे.

त्याच पत्रात विवेकानंद समाजवादाची शक्तीस्थाने आणि मर्मस्थाने सांगतात: हा समाजवाद येईल त्यावेळी शुद्रांची, कामगारांची आर्थिक स्थिती सुधारेल; त्यांचा समाजातील दर्जा सुधारेल; शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होईल. पण हे सांगत असतानाच त्यांच्या मनात समाजवादाबद्दल काही शंकाही आहेत. ते म्हणतात: मात्र या समाजरचनेत मानवी स्वातंत्र्याचा लोप होईल; असामान्य प्रतिभावान माणसे निर्माण होणार नाहीत. हे सारे सांगत असतानाच, हा प्रयोग आता झाला पाहिजे, त्यामुळे या रचनेतील त्रुटी आपणाला समजतील व आपण त्या दूर करू हा त्यांचा विचार आहे.* या समाजवादाला धर्माची जोड द्यावी लागेल हे त्यांनी इतरत्र सांगितले आहे. मात्र त्याचबरोबर, उद्याचा धर्म, सर्व धर्मांवर आणि विज्ञानावर आधारित असेल. त्यामुळे यापुढे धर्म हा स्थितीशील नसेल तर विज्ञानावर आधारित असल्याने तो गतीशील आणि परिवर्तनीय असेल.

* आज २१व्या शतकात दक्षिण अमेरिकेत व इतरत्र जे समाजवादाचे प्रयोग होत आहेत त्यातून ह्या शंकांचे निरसनच झाले असे आज म्हणावे लागेल. या देशांमध्ये फक्त गरिबी व बेरोजगारीसारख्या समस्या दूर केल्या जात आहेत असे नाही तर लोकांना शिक्षण, आरोग्य, निवारा व अन्य सामाजिक सुविधा मोफत वा अत्यंत कमी दरात पुरवल्या जात आहेत. लोकांमधील अंगभूत क्षमता विकसित करण्याच्या संधी मिळत आहेत. सर्वात महत्त्वपूर्ण हे की हे सर्व अत्यंत लोकशाही पद्धतीने होत आहे. (संपादक)

समाजवादी माणूस देशात, देशासाठी काम करत असताना जगातील दलितांबाबत तेवढाच सजग आणि सक्रिय असतो. विवेकानंद असेच होते. ९ सप्टेंबर १८९५ च्या पत्रात त्यांनी लिहिलंय, “फक्त सुशिक्षित हिंदूंमध्येच आढळून येणाऱ्या जात्यंध, धर्मभोळ्या, निर्दय, दांभिक, नास्तिक भेकडांमधील एक बनून जगावे आणि मरावे यासाठीच मी जन्माला आलो आहे असे का तुम्हाला म्हणावयाचे आहे? ... मला माझ्या देशाविषयी खोटा अभिमान नाही. मी जितका भारताचा आहे तितकाच जगाचाही आहे. याबाबतीत खोटेपणा मुळीच नाही.”

विवेकानंद समाजवादी आहेत. परिवर्तनाच्या व अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील ते अग्रदूत आहेत. मात्र त्यांची मांडणी वेगळी आहे.

धर्माची मर्यादा आणि धर्माने केलेल्या चुका सांगताना ३ मार्च १८९४ च्या पत्रात ते म्हणतात:

> सामाजिक गोष्टींच्या बाबतीत धर्माने ढवळाढवळ केली ही धर्माची मोठी चूक झाली. पण हाच धर्म पुन्हा ‘समाजसुधारणेशी धर्माचा काय संबंध?’ असेही म्हणतो. हा धर्माचा ढोंगीपणा आहे. धर्माने समाजसुधारक होऊ नये असे आम्हालाही वाटते हे खरे, पण त्याचबरोबर आमचा असाही आग्रह आहे की, सामाजिक नियमांचा कर्ता होण्याचाही धर्माला काही अधिकार नाही. प्रत्येक लहानसहान सामाजिक गोष्टीत ढवळाढवळ करण्याची पुरोहित वर्गाला काय आवश्यकता होती? त्यामुळेच तर आज अगणित माणसे कष्ट भोगत आहेत. म्हणून धर्माचा संबंध केवळ आत्म्याशी असून त्याने सामाजिक बाबतीत हात घालू नये हे त्याला सांगितले पाहिजे.

मात्र एवढी परखड मते मांडणाऱ्या विवेकानंदांची चळवळीची मांडणी वेगळी आहे. सप्टेंबर १८९३ मध्ये झालेल्या सर्वधर्म परिषदेतील त्यांच्या एका भाषणामुळे धर्मगुरू म्हणून ते अचानक जगाच्या व्यासपीठावर आले. मात्र त्यानंतर केवळ दोन महिन्यांनी २ नोव्हेंबर १८९३ मध्ये आपल्या शिष्यांना पत्र पाठवून त्यांनी कळविले:

> बुद्धदेवांपासून राजाराममोहन रॉय यांच्यापर्यंतच्या सर्व धर्मसुधारकांचे आणि परिवर्तनवादी तरुणांचे प्रयत्न फसले. कारण त्यांनी धर्मावर आघात केला. आपणाला धर्माचा आधार घेऊन धर्मातील अपप्रवृत्तींवर आघात करावा लागेल.

आपली रणनीती आपला भाऊ महेंद्रनाथ यांना सांगताना ते म्हणाले होते:

> धर्मवेडासारखा मानवी मनाला होणारा दुसरा भयावह रोग नाही. मी धर्माचे वेड पांघरलेला एक विचारवंत आहे.



अर्थातच ही लढाई वाटते तेवढी सोपी नाही. पण ती कशी लढायची तेही विवेकानंदांनी सांगितलंय. त्यांनी लिहिलंय, “प्रत्येक धर्माची धार्मिक नव्हे तर आर्थिक मांडणी कशी आहे त्यावर तो धर्म तरतो किंवा संपतो.” हिंदू धर्माने आपल्याच देशात वसाहतीचे राज्य निर्माण करून ८०% लोकांची पिढ्यान्‌पिढ्या, शतकानुशतके घृणास्पद पिळवणूक करणारी रचना देऊन, २० टक्के लोकांना या देशात सोन्याचा धूर निघतो आणि दुधाच्या आणि मधाच्या नद्या वाहतात अशी जीवनपद्धती दिली. ज्यावेळी या वा त्या कोणत्याही मार्गाने त्यांच्या हितसंबंधांना धोका झालाय, हे त्यांच्या लक्षात येते, त्यावेळी तुम्हाला जिवंतपणी परलोकास पाठवायचे, रस्त्यावर चिरडून मारायचे, की महात्मा फुलेंच्याप्रमाणे प्रथम उपेक्षेने, नंतर उपहासाने संपवायचा प्रयत्न करायचा आणि मृत्यूनंतर त्यांना हवे तसे कापून आपल्या चौकटीत, आपल्या नेत्यांच्या बरोबर बसवायचे एवढेच ते ठरवत असतात!

आणि त्यामुळे विवेकानंद म्हणतात (*१९०१ मध्ये बेलूर मठात दिलेले भाषण*):

> देशात कोणताही समाजाला हितकारक विचार मांडल्यावर त्याच्या विरुद्ध रूढीप्रिय सनातनी लोकांनी संतापून मोर्चे उघडावेत हे होणारच. छळ, अत्याचार सहन करण्याची ज्यांची तयारी नाही त्यांनी या परिवर्तनाच्या लढाईपासून दूर रहाणेच श्रेयस्कर आहे.

पण विवेकानंदांना आत्मविश्वास आहे की, भारतातील युवक पुढे येतील आणि हे आव्हान स्वीकारतील. ते म्हणतात (*३० नोव्हेंबर १८९४ रोजी डॉ. नंदुराव यांना पाठविलेल्या पत्रामधून*):

> महान त्यागाखेरीज कोणतीही गोष्ट कधी साध्य होत नाही. मला निश्चित ठाऊक आहे की, भारतमातेला तिच्या सर्वोत्कृष्ट व सर्वश्रेष्ठ संतानांच्या बलिदानाची आवश्यकता आहे आणि असे बलिदान करण्याचे सौभाग्य तुम्हाला लागावे हीच माझ्या मनातील इच्छा आहे.

आपण मरणार हे जन्म घेतल्यावर निश्चितच आहे. मग आपण चांगल्या उद्दिष्टासाठी मरूया. आपली सर्व कामे आपण आत्मसमर्पणाच्या भावनेने करूया.... आणखी एक गोष्ट लक्षात ठेवावयास हवी. माणसे तयार करणे हे कोणत्याही कार्याचे उद्दिष्ट हवे.

*मठातील नोंदवहीत १९ जून १८९९ रोजी काढलेल्या टिपणांचा सारांश.*